# हृदयनाथ मंगेशकर




मास्टर दीनानाथ यांचे एकुलते एक पुत्र आणि विख्यात गायिका असलेल्या चार भगिनींचा धाकटा भाऊ हृदयनाथ मंगेशकर यांनी भारतीय संगीतसृष्टीला फार मोठं योगदान दिलं आहे. ह्या लेखांचा विषय खरं तर हिंदी संगीत सृष्टी असा आहे, पण हृदयनाथ यांचं बरंचसं काम हिंदी चित्रपटांबाहेरचं (मुख्यत्वे मराठी चित्रपट) आहे. तसंच चित्रपटांव्यतिरिक्तही स्वतंत्र संगीतरचना त्यांनी केल्या आणि भारताबाहेर कितीतरी संगीताचे कार्यक्रम केल्यामुळे त्यासाठी दौरे आयोजित करण्यातही त्यांनी वेळ व्यतीत केला.

ते प्रथम संगीतकार आहेत आणि त्यानंतर गायक आहेत. परंतु कालक्रमानुसार पाहता आधी त्यांनी गाणी म्हटली. सुरैय्या आणि सुरेश एकत्र असलेल्या 'दिवाना' (१९५२) चित्रपटात दिग्गज नौशादसाठी 'ये दुनिया कैसी है भगवान' हे पहिलं हिंदी गाणं त्यांनी म्हटलं. नंतर कित्येक वर्षांनी हेमंत कुमार आणि लता यांच्या आवाजातील 'मी डोलकर ... दर्याचा राजा' हे कोळीगीत संपूर्ण भारतभर गाजलं आणि ह्या अप्रतिम सुरेल गाण्याला हृदयनाथ यांनी चाल लावली होती.

त्यानंतर या गुणवान संगीतकाराने संगीत दिलेली काही हिंदी चित्रपटगीतं पुढीलप्रमाणे आहेत -

'यारा सीली सीली' (लता - 'लेकिन')

’झुमते नैना बोले’ (आशा व एस. देशपांडे - ’लेकिन’)

’केसरिया बलमा’ (लता - ’लेकिन’)

’सुनी जी अरज हमारी’ (लता - ’लेकिन’)

’मुझे तुम याद करना और मुझको’ (लता व किशोर - ’मशाल’)

’जिंदगी आ रहा हू मै’ (किशोर - ’मशाल’)

’फुटपाथोंके हम रहनेवाले’ (हरिहरन, सुरेश वाडकर, अनुप जलोटा, शैलेन्द्र - ’मशाल’)

’ये ऑखे देखकर हम सारी दुनिया’ (लता, सुरेश वाडकर - ’धनवान’)

’तुम आशा विश्वास हमारे’ (लता - ’सुबह’)

परंतु चित्रपटांव्यतिरिक्तच्या बर्याचे आल्बममधून त्यांनी खूप उत्तमोत्तम गाणी दिली. 'Lata Sings Ghalib' हा आल्बमही त्यांचाच. त्यांच्या ज्ञानेश्वरी आणि गीता पठणाच्या आल्बममध्ये पुन्हा एकदा लता गायली आहे. तसंच हृदयनाथांनी चाली दिलेल्या गणपतीच्या आरत्याही लता गायली आहे.

ह्या संपूर्ण कालावधीत त्यांनी काही हिंदी आणि मराठी चित्रपटांना संगीत दिलं. ’आकाशगंगा’, ’अंतरीचा दिवा’, ’हरिश्चंद्र तारामती’ (नवीन), इ. चित्रपटांचा त्यात समावेश आहे. तसंच त्यांनी परदेशीही कार्यक्रमासाठी (कधी आपल्या भगिनींसोबत) अनेक दौरे केले. त्यानंतर पुन्हा बर्याच काळाने त्यांनी स्वतः संगीत दिलेले आणि लताने गायलेले मीरा भजन, कबीर, सूरदास यांच्या दोह्याचे, वगैरे आल्बम काढले.

- माणेक प्रेमचंद

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून)

**NOTE:**Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No

matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least.

'Yesterday's Melodies Today's Memories' is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand, the author, has also recently written another music book called Musical Moments From Hindi Films, celebrating 75 years of sound (and music) in Hindi Films. To buy the books, you may go to jharnabooks@yahoo.com, and to write to the author, the email address is manekpremchand@gmail.com